# किसान सारथी: स्थानिक गरजांनुसार भारतीय शेतीला समर्थन देणारा डिजिटल उपक्रम

डॉ. प्रणाली ठाकरे — विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)
डॉ. सुरेश जगदाळे — वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कु. श्रुती गायकवाड — कार्यक्रम सहाय्यक (संगणक)
कृषि विज्ञान केंद्र, नागांव, ठाणे, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर

शेती हा भारतातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणून ओळखला जातो. भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. कोरोनासारख्या कठीण काळातसुद्धा सुरळीत चालू असणारा एकमेव व्यवसाय म्हणजे शेती. प्रामुख्याने, कृषि व कृषिपूरक क्षेत्रांमध्ये निर्णय घेण्यासाठी वेळेवर योग्य माहिती मिळवणे हि एक महत्वाची गरज असते. यामध्ये सुधारित लागवडीचे तंत्रज्ञान, नवनवीन पिकांचे वाण, पशूंच्या जाती, शेतमालाचे बाजारभाव, दर्जेदार कृषी साधने, हवामानाचे अंदाज, पीक संरक्षण व इतर सल्ल्यांचा समावेश आहे. परंतु, अपुऱ्या मनुष्यबळाअभावी विस्तार यंत्रणेला प्रत्येक शेतकऱ्याचे शंकानिरसन प्रत्यक्ष भेटून करणे शक्य होत नाही. संबंधित शेतीविषयक सल्ल्यांच्या अभावी उत्पादनात घट, कमी उत्पन्न व नैराश्य अश्या समस्यांना शेतकऱ्याला सामोरे जावे लागते.

अलीकडच्या काळात पारंपारिक शेतीपद्धती पासून तर आधुनिक, शाश्वत शेतीकडे देशाची वाटचाल जोमाने चालू आहे. कृषि क्षेत्रात होणारा हा आमूलाग्र बदल नाविण्यपूर्ण संशोधन व प्रभावी विस्तार यंत्रणेमुळे शक्य झाला. विस्तार यंत्रणेचे बदलते स्वरूप, कमी वेळात जास्त शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याचा दृष्टीकोन, माहिती व तंत्रज्ञान यंत्रणेचा वापर इत्यादी बाबींचा हातभार लागला आहे. मोबाईल तंत्रज्ञानामध्ये होत असलेली क्रांती व त्याचा ग्रामीण भागात होत असलेला वापर लक्षात घेता शेतकऱ्यांना शेतीविषयक सल्ले मोबाईलच्या माध्यमातून देण्यासाठी भारत सरकारने किसान सारथी पोर्टल सुरु केले आहे.

किसान सारथी हा एक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संकल्पनेतून हे पोर्टल उदयास आले. शेतकऱ्यांना स्थानिक भाषेत ‘योग्य वेळी योग्य माहिती’ मिळावी यासाठी ‘किसान सारथी’ नावाचे डिजिटल प्लॅटफार्म कृषि आणि शेतकरी कल्याणमंत्री, श्री. नरेंद्रसिंह तोमर यांनी १६ जुलै २०२१ रोजी, डिजिटल इंडिया कॉर्पोरेशन, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकारद्वारे संयुक्तपणे लॉन्च केले आहे. हा उपक्रम दुर्गम भागातील शेतकऱ्यांपर्यंत स्थानिक भाषेत नवीनतम कृषि ज्ञान व तंत्रज्ञान पोहचवण्यासाठी सक्षम बनवतो. कृषि सल्ल्यांमधून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठीचा हा एक प्रयत्न आहे.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत जिल्ह्याच्या कृषि विकासासाठी काम करणारी जिल्हा पातळीवरील एक विश्वसनीय व जबाबदार विस्तार यंत्रणा म्हणून कृषि विज्ञान केंद्राकडे पाहिले जाते. कृषि तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि संसाधन केंद्र म्हणून ओळख आहे. देशातील विविध कृषि विद्यापीठे, संशोधन संस्था व स्वयंसेवी संस्था यांच्या अधिपत्याखाली सध्यस्थितीत ७३२ कृषि विज्ञान केंद्रे कार्यरत आहेत. जिल्हा कार्यक्षेत्रात येणाऱ्या तालुक्यांमध्ये कृषि क्षेत्रातील संशोधन व तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे कार्य या केंद्रातील विस्तार यंत्रणेमार्फत केले जाते. जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्रांकडे या पोर्टलद्वारे कृषिविषयक सल्ला देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

किसान सारथीचा लाभ घेण्यासाठी, शेतकऱ्यांनी संबंधित कृषि विज्ञान केंद्रात त्यांच्या प्राथमिक माहितीसह नोंदणी करणे गरजेचे आहे. प्राथमिक माहितीमध्ये शेतकऱ्याचे नाव, वय, मोबाईल नंबर, लिंग, पत्ता, शिक्षण, प्रवर्ग, व्यवसाय, भाषा, शेतीची संक्षिप्त माहितीचा (जमिनीचा तपशील, पीक पद्धत, पशुधन) समावेश आहे. नोंदणी झाल्यानंतर, शेतकरी तज्ञांना प्रत्यक्ष न भेटता / घरबसल्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावरून टोल फ्री क्रमांक १८००१२३२१७५/१४४२६ वर संपर्क करून कृषि आणि संबंधित क्षेत्रांबद्दल सल्ला घेऊ शकतात. कृषि विज्ञान केंद्रातील तज्ञ फोनद्वारे शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करून कृषिशास्त्र, उद्यानविद्या, पशुसंवर्धन, मत्स्यपालन व शेतीविषयक इतर बाबी प्रामुख्याने हवामान अंदाज, बाजारभाव इ. विषयांवर योग्य सल्ला देतात. तसेच आपण नोंदवलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे आपल्या पीकपद्धती व विभागानुसार भ्रमणध्वनी संदेशाद्वारे सल्ला देण्याची सुविधा देखील आहे. सदर पोर्टलचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या कार्यालयीन वेळेतच संपर्क करावा.

शेतकऱ्यांसाठी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सुविधांपैकी शेतकऱ्यांच्या प्राथमिक माहितीवर आधारित वैयक्तिक सल्ला, तज्ञांसह स्थानिक भाषेत थेट संवाद, शेतकऱ्यांचे स्थान आणि डोमेनवर आधारित संदेश, टोल फ्री क्रमांक आणि किसान सारथी वेबसाईटद्वारे नोंदणी करण्याची सुविधा यांचा समावेश आहे. या पोर्टलचा जास्तीत जास्त लाभ आपल्या आर्थिक विकासासाठी करून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्रात नोंदणी करून घेणे गरजेच आहे. शेतकऱ्यांसाठी हे पोर्टल अधिक अनुकूल होण्यासाठी प्रयत्न चालू आहेत व किसान सारथी पोर्टलची अद्ययावत नवीन आवृत्ती येणार आहे, ज्यामध्ये नवीन वैशिष्ट्यांचा समावेश असणार आहे. अशाप्रकारे, किसान सारथी हा उपक्रम केवळ शेतकऱ्यांच्या स्थान विशिष्ट माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठीच नव्हे तर भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यांमध्येही अत्यंत मोलाचा ठरतोय.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९६३७१६७७०७)